अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | मंगळवार
०४.०८.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १८५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

### थोडक्यात

## एमएमआरडीए मेट्रोचा नवा विक्रम! ३० कोटी प्रवाशांचा टप्पा पार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) संचलित मेट्रो नेटवर्कने ३० कोटी प्रवाशांचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे.

मेट्रो मार्गिका २अ (दहिसर पूर्व–अंधेरी पश्चिम), मार्गिका ७ (दहिसर पूर्व–गुंदवली), मार्गिका २ब (डायमंड गार्डन–मंडाळे, टप्पा–१) आणि मार्गिका ९ (दहिसर पूर्व–काशीगाव, टप्पा–१) या मार्गांवर ३ ऑगस्ट २०२६ रोजी हा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला. सुरक्षित, वेगवान आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक म्हणून मुंबईकरांनी मेट्रोला दिलेल्या वाढत्या पसंतीचे हे प्रतीक मानले जात आहे.

# शिक्षणमहर्षी डी.वाय.पाटील यांचं कोल्हापूरमध्ये निधन

## वयाच्या ९० व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**कोल्हापूर** – पद्मश्री पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, समाजसेवक आणि बिहार, त्रिपुरा तसेच पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल डॉ.डी.वाय. पाटील यांचे मंगळवारी (दि.४) कोल्हापूर येथे वयोमानानुसार निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. भारतीय शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या या दूरदृष्टीच्या व्यक्तिमत्त्वाच्या निधनाने शिक्षणविश्वावर शोककळा पसरली असून, देशभरातील राजकीय नेते, शिक्षणतज्ज्ञ, माजी विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान–** २२ ऑक्टोबर १९३५ रोजी जन्मलेल्या डॉ.ज्ञानदेव यशवंतराव (डी.वाय.) पाटील यांनी आयुष्यभर दर्जेदार शिक्षण सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी काम केले. शिक्षण, समाजसेवा आणि सार्वजनिक जीवनातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत भारत सरकारने १९९१ मध्ये त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले.

**१८२ हून अधिक शैक्षणिक संस्था–** डॉ.पाटील यांनी स्थापन केलेला डी.वाय.पाटील समूह आज देशातील सर्वात मोठ्या खासगी शैक्षणिक समूहांपैकी एक मानला जातो. या समूहात १८२ हून अधिक शैक्षणिक संस्था, ७ अभिमत विद्यापीठे, आंतरराष्ट्रीय शाळा आणि बहुविशेषता रुग्णालयांचा समावेश आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कृषी, क्रीडा आणि इतर अनेक शाखांमध्ये उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात या संस्थांनी मोठी भूमिका बजावली आहे. गेल्या अनेक दशकांत लाखो विद्यार्थी या संस्थांमधून घडले असून, देश–विदेशात विविध क्षेत्रांत त्यांनी आपला ठसा उमटवला आहे.

**राजकीय आणि प्रशासकीय कारकीर्द–** शिक्षण क्षेत्राबरोबरच डॉ.पाटील यांनी राजकारण आणि प्रशासनातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून काम केले. त्यानंतर २००९ ते २०१३ या कालावधीत त्रिपुराचे राज्यपाल म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. २०१४ मध्ये काही काळ त्यांनी पश्चिम बंगालच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभारही सांभाळला.

**राज्यपाल म्हणून शिक्षणाला प्राधान्य–** राज्यपालपदावर असताना त्यांनी उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रमांना प्रोत्साहन दिले. शिक्षणसंस्था उभारणी, आरोग्यसेवा आणि समाजकार्यातील त्यांच्या कार्यामुळे त्यांना सर्वपक्षीय नेते आणि समाजातील विविध स्तरांतून आदर मिळाला.

# चक्क मुंबई पोलीस दलातच वेतन घोटाळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – इतरांचे कारनामे, घोटाळे उघडकीस आणणाऱ्या, अनेक मोठ्या घोटाळ्यांचा तपास करणाऱ्या मुंबई पोलिस दलातच कोट्यवधींचा वेतन घोटाळा घडला आहे.

पोलिसांचे वेतन तसेच इतर प्रशासकीय काम करणारे मंत्रालयीन कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी हा घोटाळा केला असून, शासनाच्या सुमारे साडेसहा कोटी रुपयांवर डल्ला मारला आहे. आठ ते दहा जणांना पो–लीस असल्याचे दाखवून त्यांच्या नावाने असलेल्या बँक खात्यांवर पगाराच्या रकमा पाठविण्यात आल्याचे दिसून आले. याप्रकरणी पगार तसेच इतर प्रशासकीय कामे पहाणाऱ्या पाच अधिकारी आणि कर्मचारी यांच्याविरुद्ध समतानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, उत्तर प्रादेशिक विभाग कार्यालयातील पोलिस निरीक्षकाच्या तक्रारीवरून समतानगर पोलीस ठाण्यात, शासनाची फसवणूक करणे, पुरावे नष्ट करणे, कट रचणे अशा वेगवेगळ्या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार पोलिस कर्मचाऱ्यांचा डेटा जुन्या 'सेवार्थ' वेतन प्रणालीतून नवीन प्रणालीमध्ये स्थलांतरित करताना ही संशयास्पद अनियमितता समोर आली.

जे लोक पोलिस कर्मचारी नव्हते, त्यांना पोलिस कर्मचारी म्हणून दाखवण्यात आले आणि त्यांच्या नावावर वेतनाची प्रक्रिया करण्यात आली, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याबाबत संशय निर्माण झाल्यानंतर ऑडिट करण्यात आले.

बोगस नोंदी करून कोट्यवधींचा पगार घोटाळा मिळालेल्या माहितीनुसार, या ऑडिटमध्ये २०१९ आणि २०२० या वर्षांतील काही महिन्यांच्या पगाराच्या रकमांमध्ये मोठी तफावत आढळली.

मुंबई पोलिस दलातील प्रत्येक प्रादेशिक कार्यालयात पोलिसांचे पगार काढण्याचे काम चालते. मंत्रालयीन अधिकारी आणि कर्मचारी प्रादेशिक विभागात मोडणाऱ्या अधिकाऱ्यांचे कामाचे दिवस, थकबाकी तसेच इतर तपशील तयार करून लेखा विभागाकडे त्याचे देयक मंजुरीसाठी पाठवतात.

# बीडमधील व्हिडिओ, सुनेत्रा पवारांना 'गुंगी गुडिया' म्हणत काँग्रेसची बोचरी टीका : राष्ट्रवादीचा पलटवार, एकनाथ शिंदेंनीही सुनावलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)







**मुंबई** – काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वादाची ठिणगी पडली असून बीड दौऱ्यातील त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

त्यामध्ये, आमदार धनंजय मुंडे बोलता असताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार शांत बसलेल्या दिसत आहेत. त्यावरुन, काँग्रेसने सुनेत्रा पवार यांना गुंगी गुडिया म्हणत हिनवले, काँग्रेसने हा व्हिडिओ शेअर करत, सुनेत्रा पवार, अजून किती दिवस 'गुंगी गुडिया' बनून राहतील? असा सवालही केला. आता, काँग्रेसच्या या टीकेला राष्ट्रवादी काँग्रेसकडून पलटवार केला जात आहे. तर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही काँग्रेसला जोरदार प्रत्युत्तर दिलंय. काँग्रेस लोकांपासून दूर गेली आहे, त्यामुळे असे विधान येत आहे. मी काँग्रेस पक्षाला इंदिरा गांधींचा फोटो देणार आहे.

विरोधकांनी अशीच त्यांच्यावर टीका केली होती आणि त्याच खणकर पंतप्रधान झाल्याचा इतिहास आहे. काँग्रेस चांगल्या लोकांच्या हाती नाही, पराभव पचविता येत नाही अशी ही लोक आहेत, अशा शब्दात सुनेत्रा पवार यांच्याबद्दल महाराष्ट्र काँग्रेसने केलेल्या टीकेला राष्ट्रवादीने प्रत्युत्तर दिले आहे. सुनेत्रा वहिनी पवार या प्रत्येक आठवड्यात मुंबई पुण्यात पत्रकारांसोबत संवाद साधतात, बीडमदील ती पत्रकार परिषद होण्याआधी त्यांनी अनेक उत्तर दिली होती.

# सरसंघचालकांचा ६ ऑगस्टला 'जेन-झीं'शी संवाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक डॉ.मोहन भागवत हे ६ ऑगस्ट रोजी मुंबईतील 'नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर' (एनएमएसीसी) येथे 'इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनायटेड नेशन्स'च्या (आयआयएमयूएन) वार्षिक चॅम्पियनशिप परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यात २,००० हून अधिक विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. नीट परीक्षा पेपरफुटीविरोधात 'सीजेपी'च्या नेतृत्वाखाली झालेल्या युवा आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याच्या काही दिवसांनंतर हा कार्यक्रम होत आहे. तरुणांच्या नेतृत्वाखालील जगातील सर्वात मोठ्या परिषदांपैकी एक असलेल्या या कार्यक्रमाद्वारे ही संस्था आपला १५ वा वर्धापन दिन साजरा करत आहे. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, देशभरातील १०० हून अधिक शहरांमधील १५ ते १९ वयोगटातील विद्यार्थी या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

# अनिल देशमुखांवर 'मनी लॉंड्रिंग'चा खटला चालवण्यास 'ईडी'ला राज्यपालांची मंजुरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – बार आणि रेस्टॉरंटमधून कथित १०० कोटी रुपयांच्या खंडणी वसुलीशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याविरोधात खटला चालवण्यासाठी सक्तवसुली संचालनालयाला महाराष्ट्राच्या राज्यपालांकडून मंजुरी मिळाली आहे. राज्यपालांच्या या निर्णयामुळे 'पीएमएलए' कायद्यांतर्गत देशमुखांवर न्यायालयात आरोप निश्चिती आणि खटल्याची पुढील प्रत्यक्ष सुनावणी सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या वेळी 'ईडी'चे विशेष सरकारी वकील सुनील गोन्साल्विस यांनी न्यायालयाला माहिती दिली की, राज्यपालांनी २१ मे २०२६ रोजीच देशमुखांवर खटला चालवण्यासाठी आवश्यक असलेली मंजुरी दिलेली आहे. या मंजुरीचे पत्रही ईडीतर्फे न्यायालयात सादर करण्यात आले.

# खापरखेड्यात वर्चस्वाच्या वादातून गँगवार, भर बाजारपेठेत तडीपार गुंडांच्या दोन टोळ्यामध्ये प्राणघातक हल्ला, पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**नागपूर** – जिल्ह्यातील खापरखेड्यात रविवारच्या रात्री घडलेल्या गँगवारचा एक व्हिडीओ समोर आला असून खापरखेडातील मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यावर कशा पद्धतीने गुंडांच्या दोन टोळ्यांमध्ये तलवारी, लाठ्या–काठ्या आणि दगडांनी हाणामारी सुरू होती हे समोर आले आहे.

या हाणामारीमध्ये दोन्ही टोळ्यांमधील तीन गुंड गंभीर जखमी झाले आहे. दरम्यान, एमडी या अमली पदार्थाच्या अवैध व्यवसायाच्या स्पर्धेतून गुंडांच्या दोन टोळ्यांमध्ये ही हाणामारी झाल्याची माहिती आहे.

भर बाजारपेठेत गुंडांच्या दोन टोळ्या एकमेकांवर जीव घेणे हल्ले दरम्यान, खापरखेडा मधील मुख्य बाजारपेठेत रविवारी रात्री जुन्या वादातून गँगवार भडकले होते. सुरज कावळे आणि शेरू उईके या कुख्यात गुंडांच्या टोळीने प्रतिस्पर्धी सुमित वंजाळ आणि डगम भोसकर टोळीतील गुंडांवर तलवार, चाकू, लाठ्या काठ्या आणि दगडांनी हल्ला चढवला होता. भर बाजारपेठेत गुंडांच्या दोन टोळ्या एकमेकांवर जीव घेणे हल्ले करत होती. यात हिमांशू रवी कडू (२५) गंभीर जखमी झाला असून रक्षित कापसे आणि रोहित मेश्राम हेही जखमी झाले आहे.



प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथी मध्ये

# आर.जी.देशमुख वाठोडा शाळेचे घवघवीत यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चांदस वाठोडा** – आर.जी.देशमुख बुनियादी बालविद्या मंदिर येथील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



शाळेतील सक्षम बाबुराव वागद्रे, विहान नितीन सुरजुसे आणि आर्यन विलास सोलव हे विद्यार्थी प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथी मध्ये पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी केलेले कठोर परिश्रम, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे हे यश प्राप्त झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे परिसरातून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# इथेनॉल घोटाळा : गडकरींचा राजीनामा घ्या; काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळून सरकारमध्ये बसलेल्या काही लाभार्थ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना कोट्यवधी रुपयांचा लाभ झाला.



मात्र, त्यामुळे देशातील लाखो वाहनधारकांना नाहक त्रास होत आहे. 'ई-२०' हा मोठा घोटाळा असून त्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार आहेत, असा आरोप करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. तसेच इथेनॉल घोटाळाप्रकरणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

सपकाळ यांनी सोमवारी 'ई-२०' धोरणावरून केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली. ई-२० चा निर्णय २०३० ला लागू होणे अपेक्षित होते. पण मोदी सरकारमधील काही हितसंबंधित लोकांना लाभ मिळावा, यासाठी घाईगडबडीत हा निर्णय लादण्यात आला.

इथेनॉलऐवजी पेट्रोलमध्ये पाणी मिसळल्याच्या मोठ्या तक्रारी पुढे येत आहेत. आखातातील इंधन तुटवड्याचा फायदा उचलण्यासाठी मोठा घोटाळा झाला असून त्याचा पर्दाफाश झाला पाहिजे, असे सपकाळ म्हणाले. नितीन गडकरी यांच्या हट्टामुळे अनेक वाहने बंद पडली.

इथेनॉलची वकिली करणारे गडकरीच असून या घोटाळ्यात अनेक दलालही आहेत. या दलालांचाही लवकरच पर्दाफाश होईल. पेट्रोलच्या किंमतीत पाणी विकून लोकांनी मोठी फसवणूक केल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी देशाची माफी मागितली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या रा.से.यो.पथकाच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.




याप्रसंगी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन व हारार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.साजिद अन्वर तर मुख्य वक्ते म्हणुन आर.जी.देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अजय देशपांडे उपस्थित होते. यावेळी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.अरविंद तट्टे व्यासपीठावर उपस्थित होते .

रा.से.यो. स्वयंसेविका दामिनी देशमुख हिने उपस्थितांना नशा मुक्त भारत करण्यासाठीची शपथ दिली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यकाळ पूर्ण केलेल्या रासेयो स्वयंसेविकांना विद्यापीठाकडून प्राप्त एनएसएस प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.साजिद अन्वर यांनी प्राचार्य अजय देशपांडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. रा.से.यो. स्वयंसेविका रिया कैलाबाग, संतोषी उईके व देवयानी बंगाले यांनी मनोगत व्यक्त केले. संचालन दामिनी देशमुख, प्रास्ताविक रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.अरविंद तट्टे तर आभार आचल कांबळे हिने मानले.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा.डॉ.विवेक देशमुख, डॉ.अनिल कडू, डॉ.प्रदीप ढोले, डॉ.मनोज राठोड, डॉ.लिना गावंडे, डॉ.कविता इंगळे, डॉ.फरहीना शिरीन, प्रशांत इंगळे, आशिष लुंगे, प्रफुल्ल किटुकले, संजय वर्धे, इंदिरा खेरडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रा.से.यो.स्वयंसेविका उन्नती उईके, शिवानी खंडाते, सृष्टी बासंदे यांनी अथक परिश्रम घेतले.

स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू विद्यालयात

# इंग्रजी विषयावर प्रा.डॉ.मो.अय्युबखान यांचे मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – स्थानिक मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशन शेंदूरजनाघाट द्वारा संचालित स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू मीडल स्कूल येथे 'इंग्लिश इज द एजीएस्ट लँग्वेज ऑफ द वर्ल्ड ' या विषयावर एक दिवसीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी वुमन्स कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स नागपूरचे इंग्रजी विभाग प्रमुख व प्रसिद्ध शैक्षणिक तज्ञ डॉ. अय्युब खान यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मील्लत सोशल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष अब्दुल शकील होते.

यावेळी अब्दुल शकील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाची आवश्यकता व पाहूण्याचा परिचय करून दिला. 'इंग्लिश इज द इजीएस्ट लँग्वेज ऑफ द वर्ल्ड' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.खान यांनी 'आपण आपली मातृभाषा जपली पाहिजे आणि तिचा आदर केला पाहिजे. असे सांगितले.

कार्यक्रमाला विद्यार्थी सर्व शिक्षक आणि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तराचे सत्र घेण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन नईम अहमद यांनी तर आभार नईम शेख जरुडकर यांनी मानले.



**वरुड :** मोर्शी मतदारसंघाचे माजी आमदार तथा राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांना पुष्पगुच्छ देवुन वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना माजी नगराध्यक्ष रविंद्र थोरात, नरेंद्र उपरकर, नगरसेवक नितेश धुर्वे, प्रकाश माळोदे तथा उपस्थित डॉ.वसुधा बोंडे.

# लोणीच्या न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश स्कूल येथे आषाढी एकादशी उत्साहात साजरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – लोणी येथील न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश स्कूल मध्ये आषाढी एकादशी निमित्त वारी तसेच विठ्ठल रुक्मिणीच्या पूजनाचा कार्यक्रम नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका जया बारमासे व शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री.विठ्ठल रुक्मिणी प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर नर्सरी ते के.जी.२ च्या विद्यार्थ्यांच्या रूपात साक्षात वारकऱ्यांचे दर्शन होत होते. चिमुकल्यांनी वारकरी, विठ्ठल रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या आकर्षक वेशभूषेत दिंडी काढून उपस्थितीची मने जिंकली. टाळ मृदुंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा तुकारामाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. प्रायमरीच्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी प्रतिमा काढून त्यांना विविध धान्याने सजविले.



कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. संचालन दीक्षा पडोळे आणि दिव्यांनी पाचपोहर यांनी केले.

**सातपुडा जंगल सफारीची वर्षपूर्ती : पर्यटकांचा उदंड प्रतिसाद, स्थानिकांना रोजगाराची संधी**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जळगाव** – ग्रामीण विकास, पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेच्या जतनाचा अनोखा अनुभव देणाऱ्या उत्तर महाराष्ट्रातील पहिल्या सातपुडा जंगल सफारीला रविवारी एक वर्ष पूर्ण झाले.

या वर्षभरात पर्यटकांनी सफारीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने वन विभागाने समाधान व्यक्त केले आहे.

रावेर तालुक्यातील पाल अभयारण्यात २ ऑगस्ट २०२५ रोजी सुरू झालेल्या या जंगल सफारीचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते झाले होते. सातपुड्याचा निसर्ग, संस्कृती आणि जैवविविधतेचा अनुभव घेण्यासाठी कुटुंबासह भेट देण्याचे आवाहन त्यांनी उद्घाटनप्रसंगी केले होते.

श्री यशवंत परिवार सेवाभावी संस्था द्वारा मुसळखेडा येथे

# श्री गुरुपौर्णिमा निमित्त भव्य महाप्रसाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथून जवळच असलेल्या लाखो भाविकांचे श्रद्धास्थान श्री क्षेत्र मुसळखेडा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री गुरुपौर्णिमा निमित्त विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



यामध्ये विशेष म्हणजे दर्शनाला येणाऱ्या सर्व हजारो भाविक भक्तांकरिता भव्य महाप्रसादाचे वाटप सकाळी ७ वाजेपासून ते रात्री ८ वाजेपर्यंत करण्यात आले.

तसेच सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत श्री यशवंत महाराज यांच्यावर आधारित भक्तीमय भजनाचा आनंद सर्व भाविक-भक्तांना श्री यशवंत माउली भजनी मंडळ, मुसळखेडा यांच्या सुमधुर वाणीतून ऐकायला मिळाला. तसेच दर पौर्णिमा निमित्य होणाऱ्या दुपारी १२ वाजताच्या महाआरतीचा लाभ सुद्धा असंख्य भाविकांना घेतला. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे 'न्यू पारंबी मल्टीपर्पज सोसायटी' द्वारा संचलित सुमनबाई उपासे नेक्सस इंटरनेशनल स्कूल व एस.बी.देशमुख लिटल स्टार कॉन्व्हेंटच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी 'वारी' विठू नामाच्या गजरात आपल्या गुरूंच्या भेटीला आणली आणि आपल्या नृत्यातून उपस्थितांची मने मोहीत करून घेतली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्व भाविक-भक्त, दानदाते, सेवेकरी व श्री यशवंत परिवार सेवाभावी संस्था मुसळखेडा यांनी अथक परिश्रम घेतले.

# पशुधन विकास अधिकारी डॉ.पूजा बहुरूपी रुजू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

युवा मित्र मंडळ पुसलाच्या आंदोलनाला यश

**वरुड** – पुसला येथील शासकीय पशु दवाखान्यामध्ये कायम स्वरूपी पशुवैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे पशूंची गैरसोय होत होती, यासंदर्भात आंदोलन सुध्दा छेडण्यात आले होते अखेर डॉ.पूजा बहुरुपी रुजु झाल्याने युवा मित्र मंडळाच्या आंदोलनाला यश मिळाल्याचे बोलल्या जात आहे.



येथील पशुपालक उपचाराकरीता खाजगी डॉक्टरांकडे गेले असता शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत होता. याकरिता ६ जून २०२५ ला पुसला येथील पशु दवाखान्याला सुरज धर्मे यांच्या नेतृत्वात तालाठोको आंदोलन करण्यात आले होते. पूर्ण आठवडा पशुदवाखाना सुरू राहावा त्याकरिता, तात्पुरती म्हणून तीन पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आली होती परंतु काही महिन्यात त्यांची बाहेर ठिकाणी बदली झाल्यामुळे पशुदवाखाना वारंवार बंद राहुन पशुपालकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. तेव्हा आपण लवकरात लवकर कायमस्वरूपी पशूवैद्यकीय अधिकारी द्यावा.असे निवेदन पंचायत समिती गटविकास अधिकारी खुशाल पिल्लारे यांना देण्यात आले होते.

या निवेदनाची दखल घेत पशुधन विकास अधिकारी डॉ.पूजा बहुरूपी यांनी कायमस्वरूपी पुसला येथील शासकीय पशुदवाखान्याचा नुकताच पदभार स्वीकारला तेव्हा युवा मित्र मंडळ पुसला तर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले व पंचायत समिती प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

यावेळी युवा मित्र मंडळ पुसला अध्यक्ष सुरज धर्मे, उपाध्यक्ष जावेद शेख, सहसचिव धिरज सावरकर, प्रमोद पाटील, कमलेश खपरिये, योगेश राऊत, निलेश राऊत, बलदेव सावले, ऋषीं कोहळे, देवांशू नारनवरे आदी उपस्थित होते.

# संपादकीय

**{ सत्य हे सूर्यासारखे असते, ते काही काळ ढगांमागे लपते पण कधीच मावळत नाही. }**

## राष्ट्रभक्तीचा जागर जगभर आणि देशभर व्हायलाच हवा!

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार आणि संवादाची दारे जगभर खुली झाली आहेत. एका देशातील घटना काही क्षणांत संपूर्ण जगाला समजते. अशा वेगाने बदलणाऱ्या काळात आपल्या देशाविषयीची निष्ठा, अभिमान आणि कर्तव्यभावना अधिक दृढ असणे आवश्यक आहे. राष्ट्रभक्ती म्हणजे केवळ तिरंग्याला सलाम करणे, राष्ट्रगीत म्हणणे किंवा राष्ट्रीय सण उत्साहात साजरे करणे एवढ्यापुरती मर्यादित नसते. राष्ट्रभक्ती म्हणजे देशाच्या प्रगतीसाठी प्रामाणिकपणे योगदान देणे, संविधानाचा आदर करणे, सामाजिक ऐक्य जपणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि आपल्या जबाबदाऱ्या निष्ठेने पार पाडणे होय. त्यामुळे राष्ट्रभक्तीचा जागर केवळ देशभरच नव्हे तर जगभर व्हायला हवा. भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांनी समृद्ध असलेला देश आहे. या विविधतेतूनच आपल्या राष्ट्राची खरी ताकद निर्माण झाली आहे. स्वातंत्र्यलढ्यात असंख्य क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, नेताजी सुभाषचंद्र बोस, चंद्रशेखर आझाद, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल यांसारख्या महान व्यक्तींनी देशासाठी केलेले त्याग आजही प्रेरणादायी आहेत. त्यांच्या बलिदानाची आठवण ठेवून प्रत्येक भारतीयाने राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान दिले पाहिजे. आज राष्ट्रभक्तीची व्याख्या बदलण्याची गरज आहे. देशावर प्रेम करणे म्हणजे केवळ घोषणा देणे किंवा सामाजिक माध्यमांवर देशभक्तीचे संदेश शेअर करणे नव्हे. कर प्रामाणिकपणे भरणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, भ्रष्टाचाराला विरोध करणे, मतदानाचा अधिकार जबाबदारीने बजावणे, महिलांचा सन्मान राखणे आणि सामाजिक सलोखा जपणे हीसुद्धा राष्ट्रभक्तीचीच रूपे आहेत. प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले तर देश आपोआप प्रगतीच्या मार्गावर जाईल. जगभरात राहणारे भारतीय आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जपान, मध्यपूर्व किंवा आफ्रिका अशा अनेक देशांत भारतीयांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. विज्ञान, वैद्यकीय क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, उद्योग, शिक्षण, संशोधन आणि कला या सर्वच क्षेत्रांत भारतीयांची ओळख निर्माण झाली आहे. परदेशात राहूनही अनेक भारतीय आपल्या संस्कृतीशी जोडलेले आहेत. ते भारताचा सन्मान वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतात. हीदेखील राष्ट्रभक्तीचीच व्यापक भावना आहे. त्यामुळे राष्ट्रभक्तीचा संदेश सीमांच्या पलीकडेही पोहोचणे गरजेचे आहे. आजच्या काळात समाजमाध्यमांचा प्रभाव प्रचंड वाढला आहे. काही वेळा खोट्या बातम्या, अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि समाजात फूट पाडणारे प्रचार यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला




# ‘शैक्षणिक सेवेशी एकनिष्ठ शिक्षक लिलाधर कोल्हे!’

‘गावाची ओळखूनी जबाबदारी! शिक्षक जिव्हाळ्याने काम करी! हे ग्रामगीता ग्रंथातील एकोणविसाव्या जीवन शिक्षण अध्यायात सांगितल्याप्रमाणे कोल्हे सरांचे वडिल व आदर्श शिक्षक मनोहर कोल्हे गुरुजी हे वडाळा तालुका वरुड जिल्हा अमरावती येथील जिल्हा परिषदेत काम करणारे आदर्शवत शिक्षक, त्यांचे हस्ताक्षर जणू काही बोलती भिंत, आजही त्यांनी काढलेले छत्रपती शिवाजी महाराज व इतर नेत्यांचे चित्र त्यांनी रेखाटलेले त्यांच्या घरी व शाळेत पाहायला मिळतात, शालेय क्रिडा स्पर्धेच्या निमित्ताने आजही लोक दुसऱ्या पिढीतील शिक्षकांचे नाव काढतात, आपल्या शैक्षणिक कामाशी एकनिष्ठ,कामाशी काम ठेवणारे, त्यांच्या सोबत काम करणारे आदर्शवत जिल्हा परिषदेचे अनेक शिक्षक सुधाकर नागमोते, शंकर धोटे, विठ्ठल नवले, वासुदेव देशमुख, वामन गोडांने,एस.एम.श्रीराव आजही वरुड परिसरात अनेक सेवा निवृत्त माजी शिक्षकांची संघटनाच आहे.ते कार्यक्रमाचे निमित्ताने त्यांच्या वडिलांचे सेवा कार्याची जाणीव करुन देतात. अशा या जातीने शिक्षक राहणाऱ्या कुटुंबात लिलाधर मनोहरराव कोल्हे सरांचा ५-७-१९६८ साली शांताबाई व मनोहर कोल्हे यांचा शिक्षक कुळात जन्म झाला. यांचे प्राथमिक शिक्षण देशमुख वडाळा येथे त्यांनतर राजुरा बाजार तर महाविद्यालयीन शिक्षण वरुड येथे झाले. त्यांचे सहाध्यायी शिक्षक



आजही त्यांच्या शैक्षणिक घडामोडी सांगतात. अतिशय गरीबिच्या परिस्थितीत सुरुवातीला वडीलांना पंच्याहत्तर रुपये पगारात त्यांनी दोन मुली व एक मुलगा यांचे शिक्षण बी.एस.बी.एड पूर्ण केले. प्रथमताच जागृत नवयुवक शिक्षण संस्था, वरुड व्दारा संचालित प्रल्हादराव साबळे जागृत विद्यालय, सुरळी तालुका वरुड जिल्हा अमरावती येथे वर्ग ५ ते ७ च्या विना अनुदानित नव्याने सुरु केलेल्या शाळेवर दिनांक ७-८-१९९२ रोजी नियुक्ती करण्यात आली, त्यावेळी सर्व शिक्षक बंधू सायकल किंवा एस.टी.महामंडळाच्या बसनेच जायची, कोल्हेसर विज्ञान विषय शिकविण्यात निष्णात होते. त्यांच्या शैक्षणिक सेवा कार्यात त्यांची पत्नी मनिषा, मुलगी आयुषी, चिरंजीव यांचाही सहभाग आहे. इ.स.३०आक्टोंबर१९९५ पासून त्यांचा माझा संबंध आला. त्यावेळी जीवशास्त्राचे शिक्षक राजेश सोनारे, शारीरिक शिक्षक गंगाधर चोरोडे, प्रयोगशाळा प्रमुख रामदास चोरे, लिपीक ढोरे, सुरुजुसे बाबू सेवा कार्यात होते. तर कलाशिक्षीका जे.पी.तुपट, ग्रामीण शाळा कशी चालते याचा परिपूर्ण अभ्यास शिपाई अरुण कोहरे सर्व शैक्षणिक कार्यात मदत करायचे. या सर्व साबळे जागृत विद्यालय, सुरळीचीं धुरा संस्थेचे सचिव व मुख्याध्यापक श्री खुशाल वैद्यगुरुजीच्यां हाताखाली काम करायचे अशा वेळी लिलाधर कोल्हे सर यांनी तालुका व जिल्हा विज्ञान प्रदर्शनी, विज्ञान प्रश्न मंजुषा व विज्ञानाचे प्रयोग स्वतः करुन ध्यायचे, बिनपगारी सेवा साधारण सहा वर्षांपर्यंत चालविली. जन्म दर घटल्याने आणिकब जवळपास जिल्हा परिषदेच्या एक दोन किलोमीटरवर सरकारी शाळा सभोवताली असल्याने विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी खुप पायापीट करावी लागत असे अशा आमच्यातील लष्करे सर, कुकडे सर, गोंडसे सर, राठी सर, पृष्पा मोरे मॅडम आम्ही सर्व जण दहाशब्द बोलायचो तर कोल्हे सरांचा मोजून मापून एक शब्द निघायचा, शालेय विज्ञान विषय शिकवितांना विषयाच्या वैतिरीक्त एकही जास्तीचा शब्द नसायचा, शिक्षण प्रशिक्षण शिबिरांचे निमित्ताने महिन्यातून एक शनिवारी केंद्र प्रमुख इंगळे साहेब कार्यशाळा ध्यायचे शिक्षकांना प्रबोधन करायचे.विदया श्री सर्व विषयात पारंगत झाले पाहिजे आम्ही भाषा शिक्षक खुप बोलून जात असे परंतू कोल्हे सरांचा ढाचा ठरलेला होता. इ.स.१९९८ ला विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे कार्यवाह श्रावण बरडेसर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सभा, बैठका झाल्या आम्ही सर्व शिक्षक बंधू - भगिनी शिक्षण संचालक, अमरावती विभाग अमरावतीच्या कार्यालया समोर आमरण उपोषणाला बसलो,आमच्या सोबत विदर्भातील २७८ शाळा सहभागी झाल्या. त्यावेळी शिवसेनेचे प्रा.मनोहर जोशी मुख्यमंत्री असतांनाच आदरणीय प्रा.बि.टी.देशमुख साहेबांनी एल.ये.क्यू.लावला आणि नागपंचमीच्या दिवशी यश प्राप्त झाले. अशा वेळी आमच्या जागृत शिक्षण संस्थेच्या पाचही शाळा अनुदानित झाल्या. अशावेळी आमच्यासोबत कार्यवाह श्रावण बरडे सर यांनी अथक परिश्रम घेतले. ते दिवस कसे भरले. पाहता-पाहता कळले सुद्धा नाही. सरकारनी काही समाजातील जातीला विशिष्ट सवलती दिल्या. तेव्हा कोल्हे सरांची एस.टी.प्रवर्गामध्ये झाली आणि काही कालावधीत एस.टी.दर्जा कमी करुन आता एस.बी.सी.वर्गामध्ये त्यामुळे चौथीस पस्तीस वर्षाची शैक्षणिक सेवा होऊन काही गोष्टीला मुकावे लागले. अशा अनेक घडामोडी शिक्षणव्यवस्थेत दिसून आल्या. त्यामुळे काही गोष्टी निमुटपणे कोल्हे सरांनी स्विकारल्या. आज जन्म दर घटल्याने अनेक ठिकाणच्या शाळा, महाविद्यालय बंद पडण्याच्या मार्गावर आहे. अशावेळी सुरळीच्या शाळेत कार्यरत कोल्हे सरांन सारख्या अनेक शिक्षकांना इ.स.२०१९ वरुड शहरातील शाळेत कार्यरत समाविष्ट करण्यात आले. आज दिनांक ३१-७-२०२६ हा त्यांच्या सेवा निवृत्तीचा दिवस परंतू गेल्या एक वर्षापासून त्यांच्या कडे राज्य शासनाच्या निवडणूक आयोगाने दिलेली बि.एल.वो.‘मतदान केंद्र स्तरीय अधिकारी’ची जबाबदारी ते सकाळची शाळा सांभाळून दैनंदिन सायंकाळपर्यंत त्या कामांचे नियोजन करीत आहेत. अशा या तिसऱ्या पिढीतील प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शिक्षकांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतांना आमचे सुरळीचे माजी हजारो विद्यार्थी वेगवेगळ्या पदांवर कार्यरत असून त्यांचे मुलें मुर्ली शिक्षण घेण्यासाठी वरुड सारख्या शहरात येत आहे. आज गेल्या तिनं चार वर्षांत आम्हा शिक्षकांची जाणिव सुरळीतपणे सांभाळली त्या विद्यार्थ्यांनं बदल कृतज्ञता व्यक्त करुन विज्ञानाचे शिक्षक असल्याने ‘प्रामाणिक पणे करणे काम! हेची आमुचे ईश्वर नाम!! ‘वैज्ञानिक संत राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा उपदेश खऱ्या अर्थाने आचरणात आणलेला आहे. त्या लिलाधर मनोहर कोल्हे सरांना पूढील वाटचालीसाठी सेवा निवृत्तीच्या मुख्याध्यापक व शिक्षक बंधू भगिनीं स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय, वरुड च्या वतीने मनापासून शुभेच्छा!’




माणिकदास बेलूरकर
अध्यापक माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय, वरुड
जि.अमरावती
मो.९४२००७६५७३


# एफडीएच्या धाडी आणि तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाया - ग्राहक संरक्षणासाठी कठोर प्रशासनाची गरज



महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासन (एफडीए) गेल्या काही महिन्यांत सातत्याने धडक कारवाया करत आहे. बनावट, भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांवर तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांवर होत असलेल्या कारवायांमुळे ग्राहकांमध्ये दिलासा निर्माण झाला आहे. या मोहिमेच्या केंद्रस्थानी असलेले एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पुन्हा एकदा आपल्या धडाकेबाज कार्यशैलीची छाप उमटविली आहे. कठोर निर्णय, अचानक तपासण्या, नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध बिनधास्त कारवाई आणि जनहिताला सर्वोच्च प्राधान्य ही त्यांची ओळख पुन्हा अधोरेखित होत आहे.

आज बाजारात भेसळयुक्त अन्नपदार्थांचे प्रमाण चिंताजनक आहे. दूध, तूप, मसाले, मिठाई, तेल, पनीर, खाद्यपदार्थांमध्ये कृत्रिम रंग, कालबाह्य वस्तूंची विक्री, तसेच निकृष्ट दर्जाच्या औषधांचा पुरवठा यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. नफेखोरीच्या हव्यासापोटी काही व्यापारी ग्राहकांच्या जीवाशी खेळत असल्याचे अनेक घटनांतून स्पष्ट झाले आहे. अशा वेळी एफडीएची कठोर भूमिका ही केवळ कायद्याची



अंमलबजावणी नसून सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणाची मोठी जबाबदारी आहे.

तुकाराम मुंढे हे महाराष्ट्राच्या प्रशासकीय सेवेत शिस्तप्रिय, प्रामाणिक आणि निर्भीड अधिकारी म्हणून ओळखले जातात. नाशिक, नागपूर, पुणे, मुंबई अशा विविध ठिकाणी त्यांनी काम करताना अनेक धाडसी निर्णय घेतले. राजकीय दबाव असो वा आर्थिक हितसंबंध, नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची त्यांची भूमिका कायम ठाम राहिली आहे. त्यामुळे त्यांचे समर्थक जितके मोठ्या संख्येने आहेत, तितक्याच प्रमाणात त्यांच्या कठोर निर्णयांमुळे नाराज होणारे घटकही आहेत. मात्र, प्रशासनाचा उद्देश लोकहिताचा असेल, तर कठोर निर्णय घेण्याचे धाडस आवश्यकच असते.

एफडीएच्या नेतृत्वाची सूत्रे स्वीकारल्यानंतर मुंढे यांनी अन्न सुरक्षा आणि औषध नियंत्रण याकडे नव्या दृष्टीने पाहण्यास सुरुवात केली. राज्यभरातील उत्पादन केंद्रे, गोदामे, मिठाई दुकाने, रेस्टॉरंट्स, खाद्यप्रक्रिया उद्योग, औषध विक्रेते आणि विविध व्यावसायिक आस्थापनांवर अचानक धाडी टाकून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी सुरू करण्यात आली. अनेक ठिकाणी अस्वच्छता, कालबाह्य माल, बनावट लेबलिंग, परवान्याशिवाय उत्पादन आणि साठेबाजी यांसारखे प्रकार उघडकीस आले. दोषींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली, तर काही प्रकरणांत परवाने निलंबित किंवा रद्द करण्यात आले. विशेष म्हणजे सणासुदीच्या काळात मिठाई, खाद्यतेल, मसाले आणि दुधजन्य पदार्थांमध्ये भेसळीचे प्रमाण वाढते. या पार्श्वभूमीवर एफडीएने विशेष तपासणी मोहीम राबवून अनेक नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले. दोषी आढळलेल्या उत्पादनांवर कारवाई करण्यात आली. त्यामुळे बाजारपेठेत एक प्रकारची धास्ती निर्माण झाली असून नियमांचे पालन करण्याकडे व्यापाऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे. ग्राहक संरक्षण हा कोणत्याही लोकाभिमुख प्रशासनाचा मूलमंत्र असला पाहिजे. प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, दर्जेदार आणि शुद्ध अन्न मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. त्याचप्रमाणे गुणवत्तापूर्ण औषधे मिळणे ही आरोग्य व्यवस्थेची प्राथमिक गरज आहे. एफडीएच्या कारवायांमुळे हा अधिकार प्रत्यक्षात सुरक्षित करण्याचा प्रयत्न होत आहे. केवळ कागदोपत्री नियम न ठेवता त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे हेच प्रशासनाचे खरे यश ठरते.

तथापि, केवळ धाडी टाकून प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. भेसळ रोखण्यासाठी उत्पादक, विक्रेते, ग्राहक आणि प्रशासन या सर्वांनी मिळून काम करणे आवश्यक आहे. ग्राहकांनीही वस्तू खरेदी करताना उत्पादनाची तारीख, गुणवत्ता चिन्ह, परवाना क्रमांक, पॅकिंग आणि बिल यांची खात्री करून घेणे गरजेचे आहे. संशयास्पद वस्तू आढळल्यास संबंधित यंत्रणेकडे तक्रार करण्याची सवय नागरिकांनी लावून घेतली पाहिजे.

आज अनेक लघुउद्योजक नियमांची संपूर्ण माहिती नसल्यानेही अडचणीत सापडतात. त्यामुळे कारवाईसोबतच जनजागृती, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन यांनाही तेवढेच महत्त्व दिले पाहिजे. प्रामाणिक व्यावसायिकांना प्रोत्साहन आणि नियमभंग करणाऱ्यांना कठोर शिक्षा, अशी दुहेरी भूमिका अधिक परिणामकारक ठरेल. मुंढे यांच्या कार्यपद्धतीवर काही वेळा टीकाही केली जाते. त्यांच्या कारवाया अतिशय कठोर असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जातो. मात्र, जेव्हा प्रश्न लाखो नागरिकांच्या आरोग्याचा असतो, तेव्हा तडजोडीपेक्षा कठोर निर्णय अधिक महत्त्वाचे ठरतात. कायदा सर्वांसाठी समान आहे, हा संदेश प्रशासनाने सातत्याने दिला पाहिजे. प्रामाणिक व्यवसाय करणाऱ्यांना अशा कारवायांची भीती नसते; उलट नियम मोडणाऱ्यांवर कारवाई झाल्याने त्यांनाच फायदा होतो. राज्याच्या अर्थव्यवस्थेत अन्न आणि औषध उद्योगाचे मोठे योगदान आहे. त्यामुळे या क्षेत्रातील विश्वासार्हता टिकवून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. निकृष्ट किंवा बनावट उत्पादनांमुळे केवळ ग्राहकांचे नुकसान होत नाही, तर संपूर्ण उद्योगाची प्रतिमाही मलिन होते. एफडीएच्या कठोर कारवायांमुळे गुणवत्तेला प्रोत्साहन मिळते आणि प्रामाणिक उद्योगांना न्याय मिळतो.


वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# मोठा मारोती देवस्थान येथे अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**जरूड** – येथील मोठा मारोती देवस्थान येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



त्यानिमित्त संपूर्ण गावातून मोठ्या प्रमाणात शोभायात्रा काढण्यात आली. या कार्यक्रमाला आमदार उमेश उर्फ चंदु यांची उपस्थिती लाभली होती. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणुन आर.एम.लोखंडे आणि गोपाल डोंगरे, माजी सरपंच सुधाकर मानकर, हे.कॉ.संजय वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन कार्य यावर प्रकाश टाकणारी भाषणे झालीत.

या कार्यक्रमात बोलताना आमदार चंदू यावलकर यांनी गावातील आपसी मतभेद, वादविवाद, तंटे, समज- गैरसमज दूर करावे महापुरुषांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन वासुदेव तायवाडे तर आभार सुधाकर वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता ज्ञानेश्वर वाघमारे, विनायक वाघमारे, सुशील वाघमारे, आशिष वाघमारे, सुधीर वाघमारे, देवानंद वाघमारे, अंकुश वाघमारे, बंडूजी वाघमारे, रवींद्र वाघमारे, वामन वाघमारे, जगदीश तायवाडे, वामन तायवाडे, नामदेव सनेसर, वैभव खंडारे, एकनाथ गोरले, प्रशांत खंडारे, विकास खंडारें, राजेश खंडारे, राहुल गोरले, प्रवीण गोरले, आशिष तायवाडे,



सचिन गोरले, नरेश खंडारे, राहुल इंगोले, भास्कर वाघमारे, विजय चांदणे, प्रभाकर तायवाडे, मंगेश बंगाले आदींनी परिश्रम घेतले.

## चितेजवळ मृतदेह तसाच सोडून नातेवाईक जीव मुठीत घेऊन पळाले

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पुणे** – अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीत जमलेले नातेवाईक, शोकाकूल वातावरण आणि सुरू असलेले धार्मिक विधी... मात्र काही क्षणांतच संपूर्ण चित्र बदलले. अचानक झालेल्या एका अनपेक्षित प्रकारामुळे उपस्थित ग्रामस्थांना मृतदेह काही काळ तिथेच ठेवून स्मशानभूमीबाहेर जावे लागले. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अंत्यसंस्कारादरम्यान मधमाशांचा हल्ला ही घटना आंबेगाव तालुक्याच्या हद्दी- वरील वडगाव पीर येथील स्मशानभूमीत घडली.

### स्व. माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे

# ‘बालसंसद’ उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – स्थानिक जागृत विद्यालय येथे वर्ग ५ ते १० पर्यंत विद्यार्थांची बालसंसद हा उपक्रम राबविण्यात आला. देशाचा लोकशाही, संविधान आणि नागरिकांचे हक्क, अधिकार आणि कर्तव्ये याची माहिती शालेय जीवनापासून अनुभव आणि वयाची १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष मतदान अधिकर मिळतो. या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना कळावीत म्हणून या उपक्रमांतर्गत निवडणुक प्रक्रिया कशी असते? निवडणुकीतील कर्मचारी, मतदान अधिकारी, केंद्राध्यक्ष यांची कर्तव्य कशी पार पाडतात? मतदार मतदान




कसे करतात? ईव्हीएम मशीन कशी वापरली जातात? यांची माहिती याअंतर्गत विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन देण्यात आली. एक विद्यार्थी आणि एक विद्यार्थिनी याप्रमाणे उमेदवार निवडून देण्यात आले.

शाळेची सर्व घटकांची जबाबदारी जबाबदार प्रतिनिधी म्हणुन कार्य करावे लागेल. याची जाणीव करून देण्यात आली. मिडलस्कुल विभागातून वर्ग ७ मधून ज्ञानेश्वरी बेलसरे आणि मुलामधून वर्ग ७ चा मीथीलेश देशमुख हे विजयी झाले.तसेच हायस्कूल मध्ये वर्ग ९ ची विद्यार्थिनी प्रियंका शेटीये आणि मुलामधून सात्त्विक निंबाळकर हे विजयी झालेत. या उपक्रमांतर्गत बालसंसदेतुन कोणती कामे करावी लागतील? सभा कशा घेतल्या जातात? शालेय समस्या, विद्यार्थ्यांच्या समस्या, सुरक्षितता, भौतिक सुविधा, शिस्त, राष्ट्रीय मूल्ये,देशभक्तीची जाणीव, जबाबदार नागरिक, विकासात्मक चळवळी इत्यादी विषयावर चर्चा करण्यात आली. मुख्याध्यापक विजय आडे, उपमुख्याध्यापक प्रदीप पाटील व पर्यवेक्षिका माधुरी मेश्राम, सर्व शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहकाऱ्याने या उत्कृष्ट अभ्यासेत्तर चळवळ म्हणुन बालसंसद हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आले.

### जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा राजुरा बाजार येथील

# मुख्याध्यापक रमेश सहारे यांचा सेवापुर्ती सोहळा उत्साहात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा राजुरा बाजार येथे मुख्याध्यापक रमेश सहारे यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मंगेश पोहणे होते. सत्कारमुर्ती म्हणुन रमेश सहारे, त्यांच्या पत्नी सुजाता सहारे व हरीश गाडगे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणुन केंद्रप्रमुख मोहन नारिंगे, राजेंद्र सुरजुसे, उपसरपंच मनोहर भोंडे, माजी सरपंच किशोर गोमकाळे, प्रशांत शिरभाते, राजेंद्र जोगेकर, ग्रा.पं.सदस्य रजनी भोंडे, प्रतिभा दाभाडे, ग्रा.पं.सचिव मनोज राऊत अरविंद गुडदे, अरविंद राऊत,




अमोल पाटील, मोरे, हर्षलता बहुरूपी, प्रियंका काकडे, शालिनी ढोले उपस्थित होते.

ग्रामपंचायत राजुरा बाजार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा सदस्य, जि.प.केंद्र शाळा राजुरा बाजारच्या सर्व शिक्षक, राजुरा बाजार केंद्र, अमडापूर हायस्कूलच्या वतीने रमेश सहारे यांना शाल, श्रीफळ व शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला तसेच हरीश गाडगे यांचा केंद्रातर्फे सत्कार करण्यात आला.

अश्विनी चांभारे यांनी सन्मान चिन्हाचे वाचन तसेच मनोगत व्यक्त केले. रंजन कुमार राठोड, किशोर पाटील, किशोर गोमकाळे, अरविंद राऊत, बोपची यांनी मनोगत व्यक्त केले. रमेश सहारे यांनी आपला जीवन प्रवास व्यक्त केला व सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सत्कारमूर्ती हरीश गाडगे यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन सोनाली धोटे, प्रास्तविक केंद्रप्रमुख मोहन नारिंगे तर आभार अश्विनी चांभारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुनंदा कुकडे, मंदा राऊत, सोनाली धोटे, अश्विनी चांभारे, इंगळे यांनी प्रयत्न केले.



### स्वामी विवेकानंद महाविद्यालयात

# गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी ग्रंथालयशास्त्र विभागप्रमुख प्रा.विजय ठाकरे, बीबीए विभागप्रमुख प्रा.चेतन गणोरकर, बीसीए विभागप्रमुख प्रा. अनुप बेले, बीएजेएमसी विभागप्रमुख प्रा.राहुल शिवारे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्रा.विजय ठाकरे यांनी आपल्या मनोगतात गुरु हे केवळ ज्ञानदान करणारे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला दिशा देणारे, संस्कार रुजविणारे आणि जीवनाला योग्य मार्ग दाखविणारे मार्गदर्शक असल्याचे सांगितले. गुरुंच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडते, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमातून गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त करत ज्ञान, संस्कार आणि मूल्यांची जपणवुक करण्याचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी प्रा.सौरभ आकोटकर, प्रा.आशिष शहाणे, प्रा.राजकुमार वानखडे, प्रा. प्रफुल्ल बोहरूपी, प्रा.आलिया खान, प्रा.साक्षी राठी तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमधून शितल इंगळे, सुरज रामटेके, नितीन भुसारी, मयूर चौरसे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संजीवनी बारस्कर यांनी केले.

# एकाच ॲपवर मिळणार एसटी, ऑटो, टॅक्सीची सुविधा! ‘छावा राईड’ लाँचच्या दिशेने मोठं पाऊल

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रातील प्रवाशांसाठी मोठी बातमी आहे. भविष्यात एसटी बस, ऑटो रिक्षा, टॅक्सी आणि ई-बस यांसारख्या विविध वाहतूक सेवांचा लाभ एकाच मोबाईल ॲपवर घेता येणार आहे.




महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या महत्त्वाकांक्षी ’छावा राईड’ प्रकल्पाच्या अंमलबजावणीला आता वेग आला असून, हे ॲप विकसित करण्यासाठी आणि चालवण्यासाठी MSRTCने अधिकृत निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. काय आहे ‘छावा राईड’ ॲप? ‘छावा राईड’ हे केवळ कॅब बुकिंग ॲप नसून राज्यातील विविध सार्वजनिक वाहतूक सेवा एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचा प्रयत्न आहे.

या ॲपमुळे प्रवाशांना वेगवेगळे ॲप वापरण्याऐवजी एकाच ठिकाणी अनेक वाहतूक पर्याय उपलब्ध होणार आहेत. या प्लॅटफफॉर्मवर पुढील सेवा उपलब्ध असतील: एसटी बस, ऑटो रिक्षा, टॅक्सी, ई-बस, कोणत्या सुविधा मिळणार? ‘छावा राईड’ ॲपमध्ये प्रवासी आणि चालकांसाठी स्वतंत्र मोबाईल ॲप असणार आहे. तसेच, वाहन पडताळणी ऑनलाइन पेमेंट जीपीएस आधारित लाईव्ह ट्रॅकिंग भाडे व्यवस्थापन तक्रार निवारण व्यवस्था ग्राहक सेवा रिअल-टाइम मॉनिटरिंगसाठी कमांड अँड कंट्रोल सेंटर यांसारख्या सुविधाही उपलब्ध असतील.

### समाजसेवकांनी साजरा केला झाडांचा वाढदिवस

# वृक्षारोपण करुन वसुंधरा वाचविण्याचा दिला संदेश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – हरी सेवा फाऊंडेशन व जायंट्स ग्रुपच्या वतीने झाडांचा वाढदिवस साजरा करून वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व समाजसेवकांनी वृक्षांची विधिवत पूजा करून त्यांना केक कापून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. पूजन आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांचे हस्ते करण्यात आले. त्यानंतर रस्त्याच्या कडेला विविध प्रकारच्या फळझाडे आणि सावलीची झाडे लावून त्यांना पाणी देण्यात आले. झाडांच्या सुरक्षेसाठी ट्री गार्ड लावण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी हरी सेवा फाऊंडेशन व जासंट्स ग्रुप यापुढेही दर महिन्याला १०० झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. कार्यक्रमाला परिसरातील ज्येष्ठ नागरिक, तरुण आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सर्वांनी एकमुखाने पर्यावरण वाचवण्यासाठी पुढाकार घेण्याचा निर्धार केला. हा उपक्रम केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित न राहता, नागरिकांमध्ये पर्यावरण जागरूकता निर्माण करण्यासाठी एक प्रेरणादायी पाऊल ठरला आहे. यावेळी जय हरी फाऊंडेशनचे अध्यक्ष नितीन



खेरडे, डॉ.मनोहर आंडे, जायंट्स ग्रुपचे लिलाधर सुपले, महेश बोरकुटे, शेषराव कडू, देवा बेलसरे, प्रेम मिश्रा, लीलाधर चौधरी, हिरामण आंडे, अरुण वानखडे, ह.भ.प.मंगेश गावंडे, ह.भ.प.उमेश कांडलकर, नगरसेवक योगेश्वर खासबागे, प्रमोद दुधे, उमेश निस्ताने, बाळकृष्ण गेडाम, भागवंत आंडे उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६६०/२०२६** **ने.ता.१६/०९/२०२६**

**अर्जदार :-** रतन मोहन बोवाडे, वय अं.५६ वर्ष, धंदा- शेती रा.कारली, ता.वरुड, जि.अमरावती, ह.मु.लेहगांव, ता.मोर्शी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** १) शामराव मोहन बोवाडे, वय अं.६५ वर्ष, धंदा-शेती, रा.जामठी (गणेशपूर), २) वसंतराव मोहन बोवाडे, वय अं.६२ वर्ष, धंदा-शेती, ३) किसन मोहन बोवाडे, वय अं.५९ वर्ष, धंदा-शेती, क्र.३ व ४ रा.कारली, ता.वरुड

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत मोहन तुळशिराम बोवाडे, रा.कारली, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# कुत्रा-मांजराला उभे केले तरी लोक निवडून देतील, हा अहंकार लोकांनी मोडून काढला : बांकीपूर पोटनिवडणुकीवरून संजय राऊतांचा भाजपवर घणाघात

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन राज्यसभेवर गेल्यानंतर रिकाम्या झालेल्या बिहारमधील बांकीपूर विधानसभा मतदारसंघात जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी १८,९५३ मतांनी दणदणीत विजय मिळवला आहे. गेल्या ३० वर्षांपासून भाजपचा सुरक्षित बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या या जागेवर प्रशांत किशोर यांच्या विजयामुळे राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे. या पराभवावरून आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर आणि त्यांच्या नेत्यांवर जोरदार टीका केली आहे. भाजपचा ३० वर्षांचा गड ढासळला बांकीपूर हा भाजपचा पारंपरिक बालेकिल्ला राहिला आहे. नितीन नवीन यांनी २०१०, २०१५, २०२० आणि २०२५ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये येथून सलग विजय मिळवला होता. त्याआधी १९९५ पासून त्यांचे वडील नबीन किशोर सिन्हा हे देखील सलग चार वेळा येथून निवडून आले होते. मात्र, या पोटनिवडणुकीत प्रशांत किशोर यांनी भाजपचा हा गड खेचून आणत जोरदार राजकीय श्रीगणेशा केला आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६२९/२०२६** **ने.ता.२८/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) मनोज लक्ष्मणसिंग चंदेल, वय अं.३० वर्ष, धंदा-मजुरी, २) श्रीमती बेबी लक्ष्मणराव चंदेल, वय अं.७९ वर्ष, धंदा- काही नाही, दोघेही रा.जरुड, ता.वरुड, ३) सिमा सुभाष सिसोदीया, वय अं.४६ वर्ष, धंदा- घरकाम, रा.सौंसर, ४) जया जगन्नाथ पटले, वय अं.४२ वर्ष, धंदा- घरकाम, रा.खापा, ता.सावनेर, ५) अलका सुभाष सिसोदीया, वय अं.३९ वर्ष, धंदा- घरकाम, रा.खैरीपंथा, ता.सौंसर, जि.छिंदवाडा ६) शितल पंकज पवार, वय अं.३६ वर्ष, धंदा- घरकाम, रा.खैरी तायगांव, ता.सौंसर, ७) वैशाली विक्रम परिहार, वय अं.३३ वर्ष, धंदा- घरकाम, रा.बेरडी, ता.सौंसर, जि.छिंदवाडा

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत चिंतामणसिंग उकंडसिंग चंदेल ( पुर्वीचे आडनाव-बिंजाळे ) व मयत नर्मदाबाई चिंतामणसिंग चंदेल ( पुर्वीचे आडनाव-बिंजाळे ), रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२९/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६२८/२०२६** **ने.ता.१५/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) राजु हरिभाऊ कुकडे, वय अं.६२ वर्ष, धंदा-मजुरी
२) नरेंद्र हरिभाऊ कुकडे, वय अं.५७ वर्ष, धंदा- मजुरी
दोघेही रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती
३) सौ.विजया प्रमोद ब्राम्हणे, वय अं.५४ वर्ष, धंदा- घरकाम
रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत हरिभाऊ आन्याजी कुकडे व मयत पार्वता हरिभाऊ कुकडे, रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१५/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२९/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६६९/२०२६** **ने.ता.०८/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) निर्मला रमेशराव आगरकर, वय अं.५४ वर्ष, धंदा-गृहिणी
२) प्रमिला हरिहर भेमडे, वय अं.५२ वर्ष, धंदा- गृहिणी
३) प्रकाश गणपत बारई, वय अं.५८ वर्ष, धंदा- मजुरी
रा.मेघनाथ वार्ड, पांढुर्णा, ता.जि.पांढुर्णा
४) नरेंद्र गणपत बारई , वय अं.५३ वर्ष, धंदा- मजुरी
५) लक्ष्मण गणपतराव बारई, वय अं.५० वर्ष, धंदा- मजुरी
क्र.१, २, ४, व ५ रा.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गणपत धोंड्या बारई व मयत गयाबाई गणपतराव बारई, रा.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०८/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०३/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६५०/२०२६** **ने.ता.०३/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) महमद आरीफ शेख भुरु, वय अं.७६ वर्ष, धंदा-काही नाही
२) शेख सुफीयान मोहम्मद शेख आरिफ, वय अं.३६वर्ष, धंदा- मजुरी
दोन्ही रा.ईस्माल नगर, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत नफीजाबी मोहम्मद आरिफ, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.


आज तारीख **०३/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# पश्चिम महाराष्ट्रातील ९१५ गावे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील : सातारा जिल्ह्यातील ३०६ गावांचा समावेश, केंद्र सरकारचा मसुदा जाहीर

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – सह्याद्री पर्वतरांगांतील पश्चिम घाटाला पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र (ईएसए) घोषित करण्यासाठी केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या नव्या मसुद्यात पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील तब्बल ९१५ गावांचा समावेश करण्यात आला आहे.

यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ५९१, सातारा जिल्ह्यातील ३०६ आणि सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील १८ गावांचा समावेश आहे. या निर्णयामुळे पर्यावरण संवर्धनासह विकासकामे, उद्योग, खाणकाम आणि स्थानिक नियोजनावर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने २७ जुलै रोजी प्रसिद्ध केलेल्या मसुद्यानुसार महाराष्ट्रातील १७ हजार ३४० चौरस किलोमीटर क्षेत्र पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील म्हणून प्रस्तावित करण्यात आले आहे.

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, जावळी, पाटण, सातारा, वाई आणि कोरेगाव तालुक्यांतील अनेक गावांचा या मसुद्यात समावेश असून, त्याचा सर्वाधिक परिणाम पाटण तालुका आणि कोयना खोऱ्यावर होण्याची शक्यता आहे.

सातारा जिल्ह्यात पाटण तालुक्यातील १०२, महाबळेश्वर तालुक्यातील ८७, जावळी तालुक्यातील ८२, सातारा तालुक्यातील ३३, तसेच कोरेगाव आणि वाई तालुक्यांतील अनेक गावांचा समावेश प्रस्तावित आहे. जावळी तालुक्यातील कास, बामणोली, हातेघर, केळघर आणि वासोटा परिसरातील गावेही प्रस्तावित यादीत आहेत.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६७०/२०२६** **ने.ता.१६/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) अफसाना परवीन रहेमान शाहा, वय अं.५२ वर्ष, धंदा-गृहिणी
२) अरशद शाह रहमान शाह, वय अं.३० वर्ष, धंदा- मजुरी
दोन्ही रा.नया दायरा, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
३) मिनहाज परवीन नजर मोहम्मद, वय अं.२८ वर्ष, धंदा- गृहिणी
रा.बसेरा, मेन रोड, बियाबानी, अचलपुर, ता.अचलपुर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रहमान शाह दरबार शाह, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०३/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६६६/२०२६** **ने.ता.०८/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) फिरोजाबी अब्दुल सलीम, वय अं.६६ वर्ष, धंदा-गृहिणी
रा.मोठा मस्जिद जवळ, पुसला, ता.वरुड, जि.अमरावती
२) नजमा परवीन अब्दुल रशीद शेख, वय अं.७० वर्ष, धंदा- गृहिणी
रा.वार्ड क्र.२, मस्जिद जवळ, पुसला, ता.वरुड, जि.अमरावती
३) शमा अख्तर रफिक पठाण, वय अं.५३ वर्ष, धंदा- गृहिणी
रा.रामटेक, ता.रामटेक, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत खातुनबी अ.सलीम शेख, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०८/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-२८७/२५-२६** **दि.२६/०५/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **मोहम्मद अशफाक मोहम्मद ईब्राहीम, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे मोहम्मद अशफाक मोहम्मद ईब्राहीम, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१९/०६/१९७४** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदर्हू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी २६/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६४२/२०२६** **ने.ता.०७/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) अनुसया अंबादास घोंगडे, वय अं.६६ वर्ष, धंदा-घरकाम
२) महेश्वर अंबादास घोंगडे, वय अं.३९ वर्ष, धंदा- शेती
३) मोरेश्वर अंबादास घोंगडे, वय अं.३६ वर्ष, धंदा- शेती
क्र.१ ते ३ रा.जमगांव, ता.वरुड, जि.अमरावती
४) सौ.राखी सतिश ढोरे, वय अं.३४ वर्ष, धंदा- घरकाम
रा.अमरावती, ता.जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत अंबादास पंजाबराव घोंगडे, रा.जामगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२९/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**





# मंत्री नितीन गडकरींच्या नागपुरातील घराबाहेर काँग्रेसचे आंदोलन

## कार्यकर्त्यांना पोलिसांनी घेतले ताब्यात



■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** – इथेनॉलमिश्रित 'ई२० इंधन' धोरणाविरोधात सोमवारी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नागपुरात तीव्र निदर्शने केली. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपुरातील निवासस्थानाला 'घेराव' घालण्यासाठी निघालेल्या या मोर्चाला पोलिसांनी वाटेतच रोखले. या दरम्यान आंदोलक आणि पोलिसांमध्ये झटापट झाली असून अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. युवक काँग्रेसतर्फे महल परिसरातील गडकरी यांच्या निवासस्थानापर्यंत मोर्चा काढण्यात आला. ई-२० इंधनामुळे वाहनधारकांचे नुकसान व अवाजवी दर याविरोधात कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. काँग्रेस आक्रमक

गडकरी यांनी संसदेत ई२० इंधनाच्या देशभरातील अंमलबजावणीबाबत दिलेल्या उत्तरावर काँग्रेसने थेट निशाणा साधला आहे. काँग्रेस सरचिटणीस जयराम रमेश यांनी एक्सवर पोस्ट करत गडकरींवर टीका केली. वाहनांचे नुकसान होत नाही, असा दावा गडकरी करत आहेत. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून ग्राहक व मेकॅनिक वेगळाच अनुभव सांगत आहेत, असे रमेश म्हणाले आहे.

# आयशर ट्रक शॉर्ट सर्किट झाल्याने जळुन खाक

## जामगाव कारली घाटाजवळील घटना

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



***शेंदुरजनाघाट*** – जामगाव कारली घाटाजवळ अचानक अशोक लेलँड कंपनीचा आयशर ट्रक शॉर्ट सर्किट झाल्याने जळाल्याची घटना नुकतीच उघडकीस आली.

शेंदुरजनाघाट पोलीस स्टेशन अंतर्गत जामगाव कारली घाटाजवळ अशोक लेलँड कंपनीचा आयशर ट्रक शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागुन जळाला असल्याची घटना घडली असून शेंदुरजनाघाट पोलिसांना १ ऑगस्टला रात्री दहा वाजता च्या दरम्यान ११२ या टोल फ्री क्रमांकावर फोन येऊन माहिती दिली की, जामगाव ते कारली रस्त्यावरील घाटाजवळ सुशील शिवाजी पाढे रा.पेंडोनी यांच्या मालकीचा अशोक लिलँड आयशर ट्रक क्र.एम एच ४० सी टी ३९९९ हा पांढुर्णा येथे ट्रकमधीलसाहित्य रिकामे करून रात्री ९.३० ते १० वाजताच्या दरम्यान पेंढोनी येथे जात आसंताना जामगाव कारली घाटाच्या मधात ट्रकला आग लागल्याचे चालकाच्या लक्षात आले असता चालकाने ट्रक बाजूला लावुन ११२ वर माहिती दिली असता ठाणेदार राहुल गवई, विरेंद्र अमृतकर, विष्णु पवार, अक्षय खराटे हे नगरपरिषद येथील अग्निशामक दलाचे कर्मचारी राहुल मांजरे व केशव वंजारी यांच्यासह घटनास्थळी पोहचुन ट्रकला लागलेली आग विझविली असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

# बनावट नोटा प्रकरणी उरुलच्या आरोपी सरपंचाचा राजीनामा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)




**कराड** – पाटण तालुक्यातील मल्हारपेठ परिसरात बनावट नोटाचलनात चालवून लोकांची फसवणूक केल्याच्या प्रकरणात अटकेत असलेला उरुल (ता.पाटण) गावाचा सरपंच नितीन जलदेव निकम याने अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला असून सदर राजीनामा पत्र ग्रामपंचायतीने सातारा जिल्हाधिकारी, पाटण तहसीलदार व पाटण पंचायत समितीचे गटविकास अधिकार्यांच्याकडे पाठविले आहे. उरुल ग्रामपंचायतीने याबाबत माहिती देताना सांगितले की, सरपंच नितीन जलदेव निकम याचा राजीनामा १ जुलै २०२६ पंचायत समितीकडे पाठवला. यानंतर उरुल ग्रामपंचायतीची विशेष मासिक सभा १४ जुलै रोजी पार पडून या सभेत सरपंचाने दिलेल्या राजीनाम्याचे वाचन करण्यात आले.

## विवेकांनद कॉलनी परिसरात घरी कोणी नसल्याची संधी साधत

# चोरट्यांनी फोडले घर : १४ हजारांचा मुद्देमाल लंपास

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – शहरातील विवेकानंद कॉलनी परिसरातील रहिवाशी असलेले महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी कनिष्ठ महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक राजेश झोटींग यांच्या निवासस्थानी कोणी नसल्याची संधी साधत बाजुलाच असलेल्या मिरची प्लॉट परिसरातील चोरटयांनी घराचे कुलूप तोडून अंदाजे १४ हजार रुपयांचे साहित्य लंपास केले असुन सीसीटीव्ही कॅमेरामध्ये चोरटे कैद झाल्यामुळे काही क्षणातच पोलिसांनी आरोपी बंटी धुर्वे याला ताब्यात घेतले.

सविस्तर माहीतीनुसार, फिर्यादी राजेश झोटींग हे त्यांचा मुलगा आणि पत्नी यांना भेटण्यासाठी अमरावती येथे गेले होते. घटनेच्या दुसरे दिवशी सकाळच्या सुमारास राजेश झोटींग यांच्या निवासस्थानी काल करणारी मुलगी जाणु विष्णु सलामे यांनी त्यांना फोन करुन सांगितले की, तुमच्या घराचे मागील दरवाजाचे कुलूप कोंडा तोडून घर उघडे आहे, चोरी झाल्याचे वाटत आहे, असे सांगितले. त्यानंतर राजेश झोटींग हे लगेच घरी आले असता घरातील बेडरुमचा दरवाजा तुटलेला दिसला व वरचे मजल्यावरील व मागील दरवाजा कुलूपकोंडा दिसला. चोरटयांनी घरातील गॅस सिलेंडर, पॉवर सप्लाय बॉक्स, चांदीचे भांडे व घरातील इतर घरगुती साहित्य असा एकूण १४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला. त्यानंतर सीसीटीव्ही कॅमेरांची तपासणी केली असता चोरटयांचा चेहरा आढळून आल्यानंतर बंटी विनोद धुर्वे याला ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी सेवानिवृत्त प्राध्यापक राजेश रुपराव झोटींग यांचे फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी बंटी विनोद धुर्वे (१९) रा.मिरची प्लॉट वरुड याचे विरुध्द कलम ३३१,४, ३०५ अ भा.न्या.सं.अन्वये गुन्हा दाखल केला असुन आरोपी बंटी धुर्वे याला अटक करुन त्याचे ताब्यातून चोरीला गेलेला मुददेमाल ताब्यात घेतला आहे.

# वर्षभरापूर्वी बांधलेला पाळधी-तरसोद बायपास पूल खचला

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## खचलेल्या पुलाची पालकमंत्री व जलसंपदा मंत्र्यांकडून पाहणी



**जळगाव** – जळगाव शहरालगत वर्षभरापूर्वी बांधण्यात आलेला पाळधी-तरसोद बायपास महामार्गावरील पुलाचा काही भाग निकृष्ट कामामुळे दोन दिवसापूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे खचला होता. या पुलाची राज्याचे पाणीपुरवठा, स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी आज प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. प्राथमिक निरीक्षणात रस्त्याच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका उपस्थित करण्यात आल्या आहेत. यापूर्वी देखील या प्रकल्पाबाबत विविध तक्रारी आल्या होत्या.

त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निपक्ष, सखोल व तात्रिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश गिरीश महाजन यंनी संबंधित यंत्रणांना दिले पावसाच्या पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे पुलाच्या संरचनेला झालेल्या नुकसानीची आणि वाहतुकीच्या सुरक्षिततेची सविस्तर माहिती अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली. यावेळी पालकमंत्री श्री पाटील यांनी संबंधित यंत्रणेला नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत आवश्यक ती खबरदारी घेण्याचे तसेच पर्यायी वाहतूक व्यवस्था प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश दिले.

नागरिकांची काळजी घ्या! नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, विकासाची कामे ही दर्जेदार, सुरक्षित आणि पारदर्शक असली पाहिजेत हीच आमची ठाम भूमिका असल्याचे महाजन यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनीही पुलाच्या स्ट्रक्चरल ऑडीटची मागणी करत संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून दुरुस्तीची प्रक्रिया गतीने पूर्ण करावी तसेच नागरिकांना कोणताही धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले.





